# महाराष्ट्र विधानपरिषद

## दिवसाच्या कामकाजाचा क्रम

## बुधवार, दिनांक ९ जुलै, २०२५

## (सकाळी १०.०० ते ११.४५ वाजता)

**सन २०२५-२०२६ च्या पुरवणी मागण्यांवर चर्चा (दुसरा व शेवटचा दिवस) खालील मंत्र्यांच्या मागण्यांवर चर्चा होईल.**

१) मुख्यमंत्री

२) उपमुख्यमंत्री (नगरविकास, सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम))

३) उपमुख्यमंत्री (वित्त व नियोजन, राज्य उत्पादन शुल्क)

४) महसूल मंत्री

५) अन्न नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री

६) जलसंपदा (गोदावरी व कृष्णा खोरे विकास महामंडळ), मंत्री

७) वैद्यकीय शिक्षण मंत्री

८) उच्च व तंत्रशिक्षण, संसदीय कार्य मंत्री

९) जलसंपदा (विदर्भ, तापी व कोकण खोरे विकास महामंडळ), आपत्ती व्यवस्थापन मंत्री

१०) पाणी पुरवठा व स्वच्छता मंत्री

११) शालेय शिक्षण मंत्री

१२) कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता मंत्री

१३) उद्योग, मराठी भाषा मंत्री

१४) पणन, राजशिष्टाचार मंत्री

१५) पर्यावरण व वातावरणीय बदल, पशुसंवर्धन मंत्री

१६) इतर मागास, बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपारिक ऊर्जा, मंत्री

१७) आदिवासी विकास मंत्री

१८) पर्यटन, खनिकर्म, माजी सैनिक कल्याण मंत्री

१९) माहिती तंत्रज्ञान व सांस्कृतिक कार्य मंत्री

अग्रिम प्रत

**२०)** क्रीडा व युवक कल्याण, अल्पसंख्यांक विकास व औकाफ मंत्री

**२१)** महिला व बालविकास मंत्री

**२२)** सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री

**२३)** कृषी मंत्री

**२४)** ग्रामविकास व पंचायत राज मंत्री

**२५)** अन्न व औषध प्रशासन, विशेष सहाय्य मंत्री

**२६)** वस्त्रोद्योग मंत्री

**२७)** सामाजिक न्याय मंत्री

**२८)** परिवहन मंत्री

**२९)** रोजगार हमी योजना, फलोत्पादन, खारभूमी विकास मंत्री

**३०)** मदत व पुनर्वसन मंत्री

**३१)** मत्स्यव्यवसाय व बंदरे मंत्री

**३२)** कामगार मंत्री

**३३)** सहकार मंत्री

**३४)** सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री

## (दुपारी १२.०० वाजता)

**एक : प्रश्नोत्तरे**

**(क) अल्प सूचना प्रश्न**

"छत्रपती संभाजीनगर येथील विद्यादीप बालसुधारगृहातील अल्पवयीन मुलींवर होत असलेल्या अमानवी व अघोरी वागणुकीबाबत" या विषयावरील श्रीमती चित्रा वाघ, वि.प.स. यांचा अल्प सूचना प्रश्न क्रमांक ४६२२

**(ख) तारांकित प्रश्न**

**दोन : कागदपत्रे सभागृहाच्या पटलावर ठेवणे –**

अप्रकाशित प्रत

(१) **उप मुख्यमंत्री तथा नगरविकास मंत्री** : "महा मुंबई मेट्रो (एम-३) संचलन महामंडळ मर्यादित यांचा सन २०२२-२०२३ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(२) **उच्च व तंत्रशिक्षण मंत्री** :

**(क)** "शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा एकसष्टावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ख)** "पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर, सोलापूर विद्यापीठ, सोलापूर यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा वीसावा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(ग)** "स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांचा सन २०२३ - २०२४ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(घ)** "सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ, पुणे यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

**(च)** "राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर यांचा यांचा सन २०२३-२०२४ या वर्षाचा वार्षिक अहवाल" सभागृहासमोर ठेवतील.

(३) **उद्योग मंत्री** : "महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, मुंबई यांचे सन २०२०-२०२१ या वर्षाचे वार्षिक लेखे" सभागृहासमोर ठेवतील.

**तीन** : (क) **म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचना — (असल्यास)**

(ख) **म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने —**

**(मंगळवार, दिनांक ८ जुलै, २०२५ रोजीच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित म.वि.प. नियम ९३ अन्वये सूचनांची निवेदने) (अनुक्रमांक १ ते ३):-**

(१) **श्री.अंबादास दानवे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ३ वर मुख्यमंत्री निवेदन करतील :-**

छत्रपती संभाजीनगर येथील वाळुज पोलीस ठाण्यांतर्गत बजाजनगरच्या आर.एल.सेक्टर मधील नामांकित उद्योजक लड्डा यांच्या

अस्थायी प्रत

निवासस्थानी दिनांक १४ मे, २०२५ रोजी सशस्त्र दरोड्याची घडलेली घटना.

(२) **श्री.सत्यजीत तांबे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक २ वर कृषी मंत्री निवेदन करतील :-**

राज्यातील शेततळ्यात शाळकरी मुंलाचे बुडून मृत्यू होण्याचे वाढलेले प्रमाण कमी करण्यासाठी शेततळ्यांच्या सुरक्षेबाबत धोरण ठरवणे तसेच सुरक्षिततेसाठी कठडे व फलक लावण्याबाबत.

(३) **श्री.शशिकांत शिंदे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक १ वर परिवहन मंत्री निवेदन करतील :-**

ई-चलन कार्यप्रणालीमार्फत होत असलेल्या अन्यायकारक दंडात्मक कारवाई विरुद्ध राज्यातील वाहतूकदारांनी व शालेय बस संघटनांनी त्यांच्यावर होत असलेल्या अकारण कारवाई विरुद्ध संप करण्याचा घेतलेला निर्णय.

(४) **श्री.सुनिल शिंदे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ५ वर उप मुख्यमंत्री (नगरविकास) निवेदन करतील :-**

पश्चिम रेल्वे आणि मध्य रेल्वे मार्गावरील परळ रेल्वे स्थानकावर महत्त्वाचा असा १२५ वर्षे जुना ब्रिटीशकालीन एल्फिस्टन उड्डाणपूल लवकरच पाडण्यात येणार असल्याने दक्षिण मुंबईतील वाहतूक कोंडी अजून वाढण्याची निर्माण झालेली परिस्थिती.

(५) **श्री.अंबादास दानवे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ८ वर पशुसंवर्धन मंत्री निवेदन करतील :-**

नंदुरबार जिल्ह्यातील आदिवासी गायी वाटप प्रकल्पातील गैरव्यवहाराची चौकशी करून कारवाई करण्याबाबत.

(६) **श्री.सचिन अहिर, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ४ वर सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री निवेदन करतील :-**

चाकण (पुणे) येथील वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्याकरिता शासनाने गांभीर्याने लक्ष घालून त्याठिकाणी सहा पदरी रस्ता व उड्डाण पुल बांधण्याबाबतचा निर्णय घेण्याबाबत.

अग्रिम प्रत

**(७) श्री.शशिकांत शिंदे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ७ वर सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्री निवेदन करतील :-**

सातारा – लोणंद मार्गावर (जि.सातारा) लहान मोठे खड्डे पडलेले असल्यामुळे दररोज मोठ्या प्रमाणात अपघात होत असल्याबाबत.

**(८) ॲड.अनिल परब, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ९ वर सामाजिक न्याय मंत्री निवेदन करतील :-**

सामाजिक न्याय विभागाच्या अखत्यारित असलेले अण्णा भाऊ साठे महामंडळाचे व्यवस्थापकीय संचालकपद मातंग व्यक्तीला देण्यासाठी एका राजकीय पक्षाच्या व्यक्तींनी सरकारच्या प्रतिनियुक्तीच्या नियमांची मोडतोड करुन प्रशासकीय कामाचा अनुभव नसणाऱ्या सहयोगी प्राध्यापकाच्या नियुक्तीचे आदेश तयार केल्याबाबत.

**(९) श्री.सत्यजीत तांबे, वि.प.स. यांच्या पुढील निकडीच्या सार्वजनिक महत्वाच्या विषयावरील सूचना क्रमांक ६ वर सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री निवेदन करतील :-**

जळगाव, अहिल्यानगर व नाशिक जिल्ह्यांतील आरोग्य यंत्रणेतील हलगर्जीपणामुळे जनतेचे होत असलेले हाल.

**चार : लक्षवेधी सूचना – (म.वि.प. नियम १०१ अन्वये) –**

**(गुरूवार, दिनांक ३ जुलै, २०२५ व मंगळवार, दिनांक ८ जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित लक्षवेधी सूचना)- [अनुक्रमांक (१)] –**

(१) **श्री. सत्यजीत तांबे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यात सुमारे ७ लाख शासकीय तसेच ६ लाख निमशासकीय कर्मचारी कार्यरत असून त्यांच्या वेतनावर दरवर्षी सुमारे ₹१.५९ लाख कोटी तर निवृत्तिवेतनावर ₹५९,८१७ कोटी इतका खर्च होणे, या कर्मचाऱ्यांसाठी वैद्यकीय बिले प्रतिपूर्तीच्या जुन्या पद्धतीने अदा केली जात असल्यामुळे अनेकदा बिले मंजूर होण्यास वर्षानुवर्षे विलंब होणे, विलंबाचा फायदा घेत काही दलाल मंडळी चुकीचे दस्तऐवज तयार करून अवास्तव खर्च मंजूर करून घेत असल्याचे प्रकार समोर येणे, अनेकदा कर्मचाऱ्यांना बिले मंजुरीसाठी दलाल साखळीचा नाइलाजाने वापर करावा लागणे, त्यामुळे भ्रष्टाचाराला प्रोत्साहन मिळणे, सार्वजनिक निधीचा अपव्यय होणे, राज्य शासनाने महात्मा ज्योतिबा फुले जनआरोग्य योजना कॅशलेस पद्धतीने राबवली असून केंद्र सरकारची

आयुष्यमान भारत योजना सुद्धा पूर्णपणे कॅशलेस असणे, मात्र इतक्या मोठ्या कर्मचारी वर्गासाठी अजूनही कॅशलेस सुविधा लागू न होणे ही गंभीर बाब असणे, वैद्यकीय सेवेसाठी वारंवार कार्यालयीन फेऱ्या, आर्थिक ताण व उपचारात अडथळा येणे हे शासकीय कर्मचाऱ्यांच्यावर विपरीत परिणाम करणारे असणे, त्यामुळे उपचारानंतर वैद्यकीय बिले प्रतिपूर्तीऐवजी कॅशलेस वैद्यकीय सेवा सुरू करणे, त्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करणे व पारदर्शक यंत्रणा उभी करणे आवश्यक असणे, याबाबत वेगवेगळ्या शासकीय कर्मचाऱ्यांच्या संघटनांनी तसेच लोकप्रतिनिधी यांनी वेळोवेळी शासनाकडे मागणी केली असणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपायोजना."

**(शुक्रवार, दिनांक ४ जुलै, २०२५ व मंगळवार, दिनांक ८ जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित लक्षवेधी सूचना)- [अनुक्रमांक (२)] —**

(२) **श्री.चंद्रकांत रघुवंशी**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"तळोदे (जि.नंदुरबार) शहराचा सन १९६५ मध्ये सिटी सर्व्हे पार पडलेला असूनही आजपर्यंत त्या सर्व्हेचे प्रत्यक्ष अंमलबजावणीचे काम झालेले नसणे, देशातील जहागिरी खालसा होऊनसुद्धा तळोदे शहरात जहागिरी पद्धत अद्याप चालू असणे, परिणामी नागरिकांना त्रास सहन करावा लागणे, कब्जेदार असतानाही मालकी हक्काची नोंद जमीन धारक नागरिकांच्या नावावर नोंदले जात नसणे, नागरिकांच्या मालमत्ता या जहागिरदारांचा नावावर सातबाराच्या उताऱ्यावर दाखवले जात असणे, त्यामुळे कब्जेदारावर जमिनीच्या कामाबाबत अथवा घराच्या नुतनीकरणासाठी जहागिरदाराकडून पैशांची मागणी करण्यात येणे, नागरिकांना प्रधानमंत्री आवास योजना (घरकुल), भु-संपत्ती हक्क, शासकीय कर्ज योजना, मालमत्ता कर भरणा, घरपट्टी यांसारख्या योजनांचा थेट लाभ मिळत नसणे, शहरातील अनेक रहिवाशी वर्षोनुवर्ष त्या जमिनीवर राहून ही कायदेशीर मालकी हक्कापासून वंचित राहणे, ही बाब अन्यायकारक असून नागरी विकासाच्या अडथळ्याचे मुख्य कारण ठरत असणे, परिणामी रहिवाशांत शासनाप्रती निर्माण झालेला तीव्र असंतोष व नाराजीची भावना, याबाबत तात्काळ जहागिरी हक्क रद्द करून सिटी सर्व्हेच्या आधारे रहिवाशांच्या मालकी हक्कांची नोंद करून प्रश्न कायमस्वरूपी निकाली काढण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

अग्रिम प्रत

**(सोमवार, दिनांक ७ जुलै, २०२५ व मंगळवार, दिनांक ८ जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेली प्रलंबित लक्षवेधी सूचना)-[अनुक्रमांक (३)] —**

**(३) श्री.अमोल मिटकरी वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **पणन मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"कृषी उत्पन्न बाजार समिती, अकोट (जि. अकोला) व जिनिंग धारक यांच्या संगनमताने जवळपास ५० कोटी रुपयांचा भ्रष्टाचार केल्याचे माहे मे, २०२५ मध्ये उघडकीस येणे, या कृषी उत्पन्न बाजार समितीने मोठ्या प्रमाणात नियमबाह्य कारभार केल्याबाबत अप्पर मुख्य सचिव (पणन), महाराष्ट्र राज्य यांच्याकडे माहे जुलै, २०२४ मध्ये केलेल्या तक्रारीनुसार विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, अमरावती यांना चौकशीचे दिलेले आदेश, सदरहू चौकशीस जाणूनबूजन केलेला विलंब तसेच कृषी उत्पन्न बाजार समितीने नियमबाह्यरित्या केलेल्या नियुक्त्या,पदोन्नती तसेच शुल्क वसुलीमधील अफरातफर, सुपरव्हिजन फी ची रक्कम वसुल करुन न भरणे, शेतकऱ्यांच्या पैश्याचा चूकारा वेळेवर न देणे, सोयी-सुविधा न देणे, कापूस बाजार शुल्क आकारणीमध्ये अफरातफर करणे, खोटा, त्रोटक व चूकीचा अहवाल वरिष्ठांकडे देणे, न्यायालयाने दिलेल्या आदेशाचे पालन न करणे, वरिष्ठ कार्यालयास चुकीची माहिती देणे, तसेच नरसिंग महाराज फार्मर्स प्रोड्यूसर कंपनी, अकोट, खरेदी-विक्री सहकारी संघ, अकोट यांनी शासकीय ज्वारी खरेदीमध्ये केलेला भ्रष्टाचार, या सर्व बाबी लक्षात घेता, कृषी उत्पन्न बाजार समिती, अकोटच्या संचालक मंडळांनी केलेल्या अनियमित कारभाराची चौकशी करुन संचालक मंडळ बरखास्त करण्याची व दोषींवर कारवाई करण्याची आवश्यकता, तसेच या बाजार समितीचे विभाजन करुन नविन चौहोट्टा बाजार समिती निर्माण करण्याची गरज, या सर्व बाबी विचारात घेऊन शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(मंगळवार, दिनांक ८ जुलै, २०२५ रोजीच्या दिवसाच्या कामकाजाच्या क्रमात दर्शविण्यात आलेल्या प्रलंबित लक्षवेधी सूचना)-[अनुक्रमांक (४) ते (८)] —**

**(४) श्री. सदाशिव खोत, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"सद्य:स्थितीत राज्यात खरीप हंगाम सुरू असून, अनेक भागांत शेतकरी पेरणीसाठी सज्ज असताना मात्र, याच काळात एचटीबीटी बियाण्याच्या संदर्भात पोलिसांकडून शेतकऱ्यांच्या घरी थेट धाडसत्र राबवले जाणे, नागपूर जिल्ह्यातील सावनेर तालुक्यातील बिडगाव येथे शेतकऱ्याच्या निवासस्थानी स्थानिक गुन्हे शाखेच्या (एलसीबी) पथकाने छापा टाकून एसटीबीटी बियाणे जप्त करण्यात येणे, त्या संबंधित शेतकऱ्यास दोन दिवसांची पोलीस कोठडी सुनावण्यात आली असुन कारवाई करण्यासाठी LCB चे पोलीस निरीक्षक, उपनिरीक्षक तसेच

हवालदार उपस्थित असणे, कृषी बियाण्यांच्या बाबतीत पोलिसांना थेट हस्तक्षेप करण्याचा अधिकार नसून अशा प्रकरणांत कृषी विभागाचा गुणवत्ता नियंत्रण विभागच सक्षम प्राधिकृत असून, त्यांच्याकडून अधिकृत तपासणी किंवा कारवाई अपेक्षित असणे, पोलिसांकडून धाड टाकणे हा त्यांच्या अधिकार क्षेत्राबाहेरचा प्रकार असून, यामुळे शेतकऱ्यांच्या आत्मसन्मानाला मोठा धक्का बसला असणे, त्यामुळे नागपूर येथील बिडगावमधील घटनेत सहभागी असलेल्या एलसीबीच्या वरील नमूद सर्व अधिकाऱ्यांवर तात्काळ निलंबनाची कार्यवाही करण्याबाबत आणि पोलिसांकडून अश्या प्रकारचे बेकायदेशीर धाडसत्र रोखण्याबाबत तात्काळ कारवाई करण्याची आवश्यकता, यावर शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(५) **श्री. कृपाल तुमाने, डॉ. मनिषा कायंदे**, वि.प.स पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **महसूल मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील विविध भागांमध्ये गौण खनिजांच्या खाणींचे उत्खनन मोठ्या प्रमाणात झालेले असणे, अनेक खाणी आता बंद पडल्या असल्याने या खाणींमध्ये पावसाचे व इतर पाणी साचलेले असणे, या साचलेल्या पाण्याची किनार धोकादायक बनली असल्याने अनेक ठिकाणी निष्पाप नागरिकांचे, विशेषतः लहान मुलांचे, या पाण्यात बुडून दुर्दैवी मृत्यू झाल्याच्या घटना समोर आल्या असणे, अनेक वृत्तपत्रे तथा प्रसिद्धीमाध्यम यांनी या विषयी बातम्या प्रसिद्ध केलेल्या असणे, या दुर्दैवी घटना भविष्यात टाळण्यासाठी आणि बंद पडलेल्या खाणींचे योग्य व्यवस्थापन करण्यासाठी शासनाने दीर्घकालीन उपाययोजना प्रस्तावित करून दोषी लोकांवर कारवाई होण्याकरिता कार्यवाही करणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही वा उपाययोजना."

(६) **श्री. श्रीकांत भारतीय**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **उद्योग मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"महाराष्ट्र राज्य विशेषत: मुंबई आणि पुणे हे आयटी मीडिया आणि मनोरंजनाचे केंद्र असल्यामुळे येथे गेम डेव्हलपमेंट उद्योग प्रस्थापित होण्यास उत्तम संधी असणे, याकडे व्यावसायिक दृष्टिकोनातून न पाहणे, जागतिक स्तरावर हा अब्ज डॉलरचा व्यवसाय असणे,भारताचा गेम उद्योगाचा आकार २०२४ पर्यंत २.८ अब्ज डॉलर इतका असणे, परंतु भारत अजूनही गेम कंझ्युमर देश असणे, यासाठी राज्याला स्वतंत्र व्हिडिओ गेम धोरण तयार करण्याची आवश्यकता असणे, या धोरणात स्टार्टअप्स, गुंतवणूकदार, विकासक, डिझायनर, आर्टिस्ट यांच्यासाठी सवलतींची आवश्यकता, या गेमिंग उद्योगासाठी विशेष आर्थिक झोन तयार करण्याची आवश्यकता, इंजीनियरिंग, डिझाईन, ॲनिमेशन आणि कॉम्प्युटर सायन्स इत्यादी अभ्यासक्रमात गेम डेव्हलपमेंटचा

अप्रकाशित

समावेश करणे, महाराष्ट्र अंतर्गत गेमिंग स्टार्टप्सना विशेष प्रोत्साहन देण्याची आवश्यकता, नव्या गेम कंपन्यांना करात सवलत देण्याची आवश्यकता, गेमिंग हार्डवेअर व सॉफ्टवेअर वरील जीएसटी मध्ये सवलत देण्याची आवश्यकता, मराठी व इतर स्थानिक भाषांमध्ये आधारित खेळ तयार करणाऱ्या स्टुडिओसाठी अनुदान देण्याची आवश्यकता, हाय स्पीड इंटरनेटवर डेटा सेंटरची स्थापना करण्याची आवश्यकता, गेमिंग साठी AR/VR, AI व ब्लॉकचेन यासारख्या अत्याधुनिक तंत्रज्ञानात गुंतवणूक करण्याची आवश्यकता, महाराष्ट्रात गेमिंग कंपन्यांची इन्व्हेस्टमेंट आयोजित करण्याची आवश्यकता, इ. स्पोर्ट्स स्पर्धांसाठी निधी उपलब्ध करून देण्याची आवश्यकता, मुद्रीकरण, प्रशिक्षणासाठी जागतिक कंपन्यांशी भागीदारी करण्याची आवश्यकता, याबाबत शासनाची प्रतिकिया व भूमिका."

(७) **श्री.अभिजीत वंजारी**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **इतर मागास बहुजन कल्याण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील इतर मागासवर्गीय समाजाच्या अनेक मागण्या शासनाकडे प्रलंबित असणे, त्यात प्रामुख्याने बिहार व तेलंगणा राज्याच्या धर्तीवर राज्यातील ओबीसींची जातनिहाय जनगणना करणे, मा.सर्वोच्च न्यायालयाने लादलेली ५० टक्के आरक्षणाची मर्यादा रद्द करण्याची शिफारस राज्य शासनाने केंद्र सरकारकडे करणे, विद्यार्थीनींना शिक्षण शुल्कात १००टक्के प्रतिपूर्ती जाहिर करणे, परंतु ओबीसी प्रवर्गातील विद्यार्थ्यांना १०० टक्के स्कॉलरशीप लागू करण्याची मागणी असणे, ओबीसी, विमुक्त जाती, भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग सामाजाचा रिक्त पदांचा अनुशेष त्वरीत भरण्यात यावा, महाज्योतीला निधी व सुविधा उपलब्ध करुन देणे, ओबीसी कर्मचाऱ्यांना पदोन्नतीमध्ये आरक्षण लागू करण्यात येणे, महात्मा ज्योतिराव फुले व ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांना भारतरत्न देण्याची शिफारस केंद्र सरकारकडे करणे, इत्यादी आग्रही मागण्या असणे, या मागण्यांच्या शासन मान्यतेसाठी राज्यातील ओबीसी समाज उपोषण धरणे, मोर्चे इ. आंदोलने करीत असणे, मात्र शासन करीत असलेले दुर्लक्ष, परिणामी राज्यातील जनतेत पसरलेले असंतोषाचे वातावरण व नाराजीची भावना, याबाबत शासनाने करावयाची तातडीची कार्यवाही व राज्य शासनाची प्रतिक्रिया."

(८) **श्री.रणजितसिंह मोहिते-पाटील**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **कृषी मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"देशात केळी उत्पादनात महाराष्ट्राचा दुसरा क्रमांक असून राज्यात सध्या १.२५ लाख हे. पेक्षा अधिक क्षेत्र केळी लागवडी खाली असणे, राज्यात सर्वाधिक निर्यातक्षम केळीचे उत्पादन होऊन देशाच्या एकूण केळी निर्यातीपैकी ६३% केळीची निर्यात महाराष्ट्रातून होत असणे, राज्यात सर्वाधिक केळीचे उत्पादन जळगाव जिल्ह्यात तर केळीची सर्वाधिक निर्यात सोलापुर जिल्ह्यातून

अग्रिम प्रत

होत असणे, सोलापूर जिल्ह्यात सध्या २२ हजार हे. क्षेत्र केळी लागवडीखाली असणे,गेल्यावर्षी महाराष्ट्रातून १२ लाख ४३ हजार ८९९ मे.टन केळीची निर्यात होऊन यातील सुमारे ८ लाख २६ हजार ३२२ मे.टन केळी सोलापूर जिल्ह्यातून एक्स्पोर्ट झालेली असणे,राज्यातून होणाऱ्या निर्यातीत सोलापूरचा वाटा सुमारे ६६.४३ % असणे,सबब सोलापूर जिल्ह्यात केळी लागवडीत होत असलेली निरंतर वाढ त्यामुळे या भागातील हवामान, मृदापरीक्षण, केळीच्या विविध जाती, लागवडीचे तंत्रज्ञान, रोग व किडींचे व्यवस्थापन, शिक्षण व प्रशिक्षण यादृष्टीने अभ्यास आणि उपाययोजना करण्यासाठी सोलापूर जिल्ह्यातील शेलगाव (वां) ता.करमाळा येथे केळी संशोधन केंद्र स्थापन करण्यासंदर्भात केळी उत्पादकांची वारंवार होत असलेली मागणी, याकडे शासनाचे होत असलेले अक्षम्य दुर्लक्ष, यामुळे केळी उत्पादक शेतकऱ्यांमध्ये निर्माण झालेली अस्वस्थता, यावर तातडीने निर्णय घेऊन अंमलबजावणी करण्यासाठी येथील कृषी विभागाची फळरोपवाटिका किंवा महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे कोरडवाहू संशोधन केंद्र यांच्या उपलब्ध जागेवर केळी संशोधन केंद्र स्थापन करण्यासाठी शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(९) **श्री.मिलिंद नार्वेकर, ॲड.अनिल परब, श्री.सतेज ऊर्फ बंटी पाटील वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **मुख्यमंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"केंद्र सरकारच्या विद्युत मंत्रालयाने २०२० व २०२१ साली सर्व राज्यांनी मोठ्या प्रमाणात स्मार्ट मीटर बसवावेत असे धोरण ‘सुधारित वीज वितरण’ या योजनेअंतर्गत आखले असणे त्यासाठी सुमारे ९०० रुपये प्रति मीटर इतकी सबसिडी देखील देऊ केली असणे, सर्व राज्यांत मिळून २० कोटीपेक्षाही अधिक स्मार्ट मीटर बसवण्याचे ध्येय ठेवले असणे, तदनुसार बेस्ट उपक्रम, महावितरण, टाटा या वीज कंपन्यांच्या प्रशासनाने वीज ग्राहकांचे जुने मीटर काढून त्याजागी स्मार्ट मीटर बसवण्याचा घेतलेला निर्णय, या निर्णयाविरोधात राज्यभरातील ग्राहक संघटना, वीज कामगार संघटना, राजकीय पक्षांनी पुकारलेले आंदोलन, विजेच्या स्मार्ट मीटर विरोधात सुरू झालेल्या जन आक्रोशाची दखल घेऊन राज्य शासनाने घरगुती वीज ग्राहकांसाठी स्मार्ट मीटर बसविण्याच्या निर्णयास स्थगिती दिली असून सामान्य वीज ग्राहकांसाठी स्मार्ट मीटर लावण्यात येणार नाही, अशी घोषणा ऊर्जा मंत्री महोदयांनी दिनांक १४ जून, २०२४ रोजी केली असणे, तरी देखील राज्यातील अनेक घरगुती वीज ग्राहकांकडे स्मार्ट मीटर बसविण्याचे काम अव्याहतपणे सुरू असणे, परिणामी, राज्यातील वीज ग्राहकांच्या मनात स्मार्ट मीटरबाबत निर्माण झालेली संभ्रमावस्था आणि गोंधळाची स्थिती, याबाबत शासनाने करावयाची ठोस कार्यवाही आणि शासनाची प्रतिक्रिया."

(१०) **सर्वश्री जयंत आसगावकर, अशोक ऊर्फ भाई जगताप, अभिजीत वंजारी, सतेज ऊर्फ बंटी पाटील, डॉ.प्रज्ञा सातव, सर्वश्री धीरज लिंगाडे, सुधाकर अडबाले, राजेश राठोड, विक्रम काळे, ॲड. अनिल परब, सर्वश्री अमोल मिटकरी, सतिश चव्हाण, संजय खोडके, इद्रिस नायकवडी वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **शालेय शिक्षण मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"राज्यातील विद्यार्थ्यांना विविध शाखांमध्ये प्रवेशाकरिता जास्तीत जास्त संधी मिळावी, या उद्देशाने आपण ऑनलाईन पध्दतीने प्रवेश प्रक्रिया राबविणे, ही बाब स्वागतार्ह असली तरी बऱ्याच केंद्रावर प्रवेश प्रक्रियेमध्ये विद्यार्थी, पालकांना अडचणी येणे, वारंवार सर्व्हर डाऊन होणे, लाईट जाणे, इंटरनेट सुविधा नसणे, अशा अडचणीमुळे मुलांना प्रवेश प्रक्रियेमध्ये रजिस्ट्रेशन करणे अशक्य होणे, काही ठिकाणी पालकांच्या खात्यावरून प्रवेश फी ट्रान्सफर झालेली दिसणे; परंतु ती जमा झालेली नसणे, या सर्व कारणांमुळे विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहत असणे, या साऱ्या बाबींचा विचार करता कोणताही विद्यार्थी प्रवेशापासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घेऊन पुढील वर्षापासून अकरावी प्रवेश प्रक्रिया ऑफलाईन पद्धतीने राबविण्याबाबत शासनाने तातडीने करावयाची कार्यवाही व यावर शासनाची प्रतिक्रिया."

(११) **डॉ.परिणय फुके**, **वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सांस्कृतिक कार्य मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"चित्रपट किंवा कुठल्याही दृकश्राव्य माध्यमातून समाजाचे चित्रण होत असणे, समाजाच्या प्रत्येक घटकावर या माध्यमाचा प्रचंड प्रभाव असणे,चित्रपट व समाज माध्यमे यातून राजकीय व्यक्तींचे चरित्र रंगविण्याची सुद्धा परंपरा असणे,मात्र महत्वाची बाब अशी की ही चरित्र नेहमी नकारात्मक रंगविले जाणे, चित्रपट नाटक आणि अन्य दृकश्राव्य माध्यमे यातून लोकप्रतिनिधी, नेता, मंत्री, खासदार, आमदार किंवा नगरसेवक अशा राजकीय पक्षाशी संबंधित व्यक्तीला गुंड, माफिया, टोळी प्रमुख अशा नकारात्मक पद्धतीने रंगविले जाणे, अशामुळे समाजात लोकशाही प्रक्रियेत समाविष्ट व लोकांच्या समस्यांकरिता नेतृत्व स्वीकारलेल्या लोकांना अनेकदा मानहानी सहन करावी लागणे, समाजाचा हा घटक चांगला नाही अशी भावना यामुळे जाणीवपूर्वक रुजविली जाणे, महिला, पुरुष, बालके यांच्या मनात राजकीय नेत्यांची प्रतिमा ही नेहमीकरिता विलन स्वरूपात घर करून रहाणे, हा मुद्दा महत्वाचा असून यावर शासनाने उपाययोजना करणे आवश्यक असणे, विधायक कार्यासाठी आयुष्य देणाऱ्या नेत्यांची प्रतिमा संवर्धन करण्याऐवजी अशी नकारात्मक प्रतिमा निर्माण होत असेल किंवा ती जाणीवपूर्वक घडवून आणली जात असेल तर शासनाने त्यावर नियंत्रण ठेवणे आवश्यक असणे, समाज बदलला, तंत्रज्ञान बदलले, पिढ्या बदलल्या मात्र राजकीय नेत्यांची प्रतिमा आजही चित्रपट आणि अन्य पूरक

माध्यमे यात काहीही बदल झालेला नसणे, यावर शासनाने नियंत्रक अशी यंत्रणा उभारणे किंवा अन्य उपाययोजना करण्याकरीता शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(१२) **श्री. संजय खोडके, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सार्वजनिक बांधकाम (सार्वजनिक उपक्रम वगळून) मंत्र्यांचे** लक्ष वेधतील:-

"महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळांचे अधिकाऱ्यांनी दिनांक ८ मे, २०२५ रोजी अमरावती शहरातील रहाटगाव ते वडगाव माहोरे रस्त्यानजीक सुरु असलेल्या उड्डाणपुलाच्या बांधकामाची पाहणी करण्यात येणे, सदर पाहणीत, उड्डाणपुलाचे बांधकाम जनरल मॅनेजर तथा प्रकल्प संचालक, नॅशनल हायवे ऑफ अथोरिटी ऑफ इंडिया यांचेद्वारा करण्यात आलेले असणे, सदर बांधकामाच्या अनुषंगाने महामार्गालगत असलेल्या शिवमंदिराच्या विरुध्द दिशेने अंदाजे १ एकर इतके जागेवर राखेची (Fly ash) साठवणूक योग्य ती उपाययोजना न करता सदर जागेच्या कडेला १० वृक्षांची वाढलेले खोड दिसत असल्यामुळे वृक्षाची अवैधरित्या वृक्षतोड करण्यात आल्याचे सिध्द होणे, साठवणूक केलेल्या राखीचे धुलीकण निर्माण होऊन ज्यामुळे हवाप्रदूषण होऊन परिसरातील नागरिकांना व महामार्गावरील वाहतुकीस अडथळा निर्माण होत असल्याने डोळयात राखीचे धुलीकण जाऊन अपघात होऊन जिवीतहानी होण्याची दाट शक्यता, नागरिकांना श्वसनाचे आजारही होण्याची दाट शक्यता निर्माण झाल्याचेही निदर्शनास येणे, जनरल मॅनेजर तथा प्रकल्प संचालक, नॅशनल हायवे ऑफ अथोरिटी ऑफ इंडिया द्वारा झालेल्या निष्काळजीपणा व अवैध वृक्षतोडबाबत गुन्हा दाखल करण्यात यावा, असे पोलीस निरिक्षक, नांदगांव पोलीस ठाणे, जि.अमरावती यांना महानगरपालिका, अमरावती यांनी लेखी कळवून देखील त्याबाबत पोलीस दलाकडून कारवाई करण्यात आली नसल्याचे दिनांक ८ मे, २०२५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास येणे, याबाबत संबंधित पोलीस निरिक्षक, नांदगांव पेठ व प्रकल्प संचालक, नॅशनल हायवे ऑफ अथोरिटी ऑफ इंडिया यांचेविरुध्द गुन्हा दाखल करण्याची गरज, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

(१३) **श्री.दादाराव केचे, वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **ग्रामविकास मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"ग्रामपंचायत जळगाव ता.आर्वी, जि.वर्धा येथील सचिव आणि सरपंच यांनी दिनांक २३ ऑगस्ट, २०२४ रोजी जेम पोर्टल वरून रु.५० लाखांची खरेदी करणे, ही खरेदी सर्व नियम व कायदे मोडून झालेली असणे, या प्रकरणाची तक्रार मुख्य कार्यपालन अधिकारी, जिल्हापरिषद, वर्धा यांच्याकडे करण्यात येणे, त्यानुसार मुख्य कार्यपालन अधिकारी यांनी ग्रामपंचायत जळगाव येथे भेट देणे, त्यांनी या प्रकरणाचा पंचनामा केला असता रु.२४ लक्ष ७६,१५२ रुपयांची

देयके अदा केल्याचे दिसून येणे, परंतु ज्या साहित्यासाठी ही देयके अदा करण्यात आली त्यामधील एकही साहित्य ग्रामपंचायतमध्ये नसणे,त्यानुसार दिनांक ६ सप्टेंबर, २०२४ रोजी सचिवास निलंबित करण्यात येऊन सचिवावर शिस्तभंगाची कारवाई करण्याचे निर्देश देण्यात येणे, परंतु सचिवाला निलंबित केल्यानंतरही कोणतीच चौकशी न करता दिनांक ८ ऑक्टोबर, २०१४ रोजी बनावट अहवाल दाखवून दिनांक १० ऑक्टोबर, २०१४ रोजी ग्रामपंचायतीने सचिवास पुन्हा नियमित करणे, सदरहू सचिव यांनी त्यानंतर रु.२० लक्ष ८४ हजार ६९९ रुपयांचे पेमेंट त्याच एजन्सीला देणे, सदरहू प्रकरण धक्कादायक असून मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी केलेला पंचनामा आणि निलंबन आदेशाचे कोणतेही पालन न होता पुन्हा सचिवास नियमित करून नियमबाह्य साहित्य खरेदी करण्यात येणे, तसेच गटविकास अधिकारी, आर्वी यांनी ग्रामपंचायत सचिव व सरपंच यांना सहकार्य केले असणे, या प्रकरणी तातडीने ग्रामपंचायत बरखास्त करून संबंधीत सचिव यांना निलंबित करण्याची गरज, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व शासनाची प्रतिक्रिया."

(१४) **श्रीमती उमा खापरे, सर्वश्री प्रविण दरेकर, प्रसाद लाड, ॲड.निरंजन डावखरे, डॉ.परिणय फुके, श्री.सदाशिव खोत वि.प.स.** पुढील तातडीच्या व सार्वजनिक महत्वाच्या बाबीकडे **सहकार मंत्र्यांचे** लक्ष वेधतील :-

"बीड जिल्ह्यातील ऊसतोड मजूर महिला मोठ्या प्रमाणात गर्भपिशवी काढत असल्याची बाब माहे जून, २०२५ च्या तिसऱ्या आठवड्यात वा त्यासुमारास निदर्शनास येणे, बीड जिल्हा ऊसतोड कामगारांचा जिल्हा असून या जिल्ह्यातील दरवर्षी पावणे दोन लाख मजूर सांगली, सातारा, कोल्हापूर व कर्नाटक राज्यात जात असणे, या मजुरांची परिस्थिती हलाखीची असल्याने ऊसतोडी शिवाय पर्याय नसणे, ऊसतोडीच्या एका व्यक्तीला अर्धा तर जोडीला पूर्ण कोयता समजला जात असणे, या जोडीला उचल म्हणून कारखान्याला जाण्यापूर्वी एक ते तीन लाख रुपये दिली जात असणे, कारखान्यावरून परत आल्यावर मजुरीचे पैसे वगळून इतर सर्व रक्कम मुकादमला परत करावी लागते, ही रक्कम परत करण्याची वेळ येऊ नये यासाठी हे मजूर ऊन, वारा, थंडी यांचा विचार न करता दिवस-रात्र १४ ते १६ तास काम केल्यावर एका व्यक्तीला तीनशे ते चारशे रुपये मिळत असणे, पैसे कमी असले तरी सलग सहा महिने काम असल्याने त्यांचे वर्षाचे आर्थिक गणित या ऊसतोडीवर अवलंबून असणे, एक दिवस जरी आराम केला तरी मुकादम खाडा मारतो, हाच खाडा पडू नये यासाठी महिला मजूर गर्भपिशवी काढून टाकण्याचा टोकाचा निर्णय घेत असणे, आरोग्य विभाग आणि प्रशासनाने याची दखल घेऊन पाच महिने किंवा त्यापेक्षा जास्त महिन्यांच्या गर्भवतीला ऊसतोडीचे काम देऊ नका असे न्यायालयाने निर्देश दिले असून याची अंमलबजावणी करण्याची गरज असणे, ऊसतोड मजुरांसाठी निर्माण केलेल्या महामंडळाने ऊसतोड कामगारांना सर्वतोपरी मदत करून ऊसतोड कामगारांच्या कल्याणाच्या योजना राबविण्याची

अग्रिम प्रत

आवश्यकता निर्माण झालेली असणे, यावर शासनाने करावयाची कार्यवाही व उपायोजना."

**पाच : म.वि.प. नियम १०१ — अ अन्वये विशेष उल्लेख — (असल्यास)**

**सहा : शासकीय विधेयके —**

**(क) विधानसभेने संमत केल्यास — विधेयक विचारात घेणे :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७८ - महाराष्ट्र (द्वितीय पुरवणी) विनियोजन विधेयक, २०२५"

**(ख) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे — विधेयक विचारात घेणे :-**

**(१)** "सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७३ — महाराष्ट्र वस्तू व सेवा कर (सुधारणा) विधेयक, २०२५"

**(२)** "सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७४ — महाराष्ट्र कर, व्याज, शास्ती किंवा विलंब शुल्क (सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम कंपन्यांनी प्रदेय असलेल्या) यांच्या थकबाकीची तडजोड करण्याबाबत (सुधारणा व विधिग्राह्यीकरण) विधेयक, २०२५

**(ग) विधानसभेने संमत केल्याप्रमाणे — विचार, खंडश: विचार व संमत करणे.**

सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७५ — महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२५

**विधेयक संयुक्त समितीकडे पाठविण्याबाबत सर्वश्री अंबादास दानवे, सतेज उर्फ बंटी पाटील, शशिकांत शिंदे, सचिन अहिर, एकनाथराव खडसे, वि.प.स. यांचा प्रस्ताव :-**

"सन २०२५ चे विधानसभा विधेयक क्रमांक ७५ — महाराष्ट्र विनाअनुदानित खाजगी व्यावसायिक शैक्षणिक संस्था (प्रवेश व शुल्क यांचे विनियमन) (सुधारणा) विधेयक, २०२५" विधानसभेची सहमती घेऊन दोन्ही सभागृहांच्या ३५ सदस्यांच्या संयुक्त समितीकडे त्यावरील प्रतिवृत्त सहा महिन्यांच्या आत सादर करण्याचा अनुदेश देऊन विचारार्थ पाठविण्यात यावे."

---------------------------------------------------------------------

अप्रकाशित प्रत

**सात** : **सर्वश्री सदाशिव खोत,** हेमंत पाटील, विक्रम काळे, प्रविण दरेकर, डॉ. मनिषा कायंदे, सर्वश्री अमोल मिटकरी, प्रसाद लाड, श्रीमती भावना गवळी, श्री संजय खोडके, ॲड. निरंजन डावखरे, सर्वश्री कृपाल तुमाने, इद्रिस नायकवडी, श्रीकांत भारतीय, किशोर दराडे, पंकज भुजबळ, श्रीमती चित्रा किशोर वाघ, सर्वश्री चंद्रकांत रघुवंशी, किरण सरनाईक, डॉ. परिणय फुके, सर्वश्री संदीप जोशी, दादाराव केचे, संजय केणेकर, योगेश टिळेकर, श्रीमती उमा खापरे, सर्वश्री विक्रांत पाटील, अमित गोरखे, वसंत खंडेलवाल, ज्ञानेश्वर म्हात्रे, रणजितसिंह मोहिते-पाटील, धर्मगुरू राठोड, राजहंस सिंह, **वि.प.स. यांचा म.वि.प. नियम २६० अन्वये प्रस्ताव --**

"राज्याच्या ग्रामीण अर्थव्यवस्थेत कृषी क्षेत्र केंद्रस्थानी ठेऊन सिंचन क्षेत्राकडे विशेष लक्ष देण्याचा शासनाचा प्रयत्न असणे, कृषी क्षेत्रात कृत्रिम बुध्दिमत्ता (ए-आय) तंत्रज्ञानाचा वापर करण्याचे धोरण अंमलात आले असणे, जलयुक्त शिवार योजना, नदीजोड प्रकल्प आणि रखडलेल्या सिंचन योजनांच्या माध्यमातून कृषी सिंचन वाढविण्यावर भर देण्यात आला असणे, विदर्भातील वैनगंगा-पैनगंगा-नळगंगा नदीजोड प्रकल्प पूर्ण झाल्यास १० लाख एकर जमिन ओलिताखाली येण्याची शक्यता असणे, नार-पार-गिरणा नदीजोड प्रकल्पामुळे नाशिक व जळगाव जिल्हयातील ४९,५१६ हेक्टर क्षेत्राला सिंचनाचा लाभ होणार असणे, दमणगंगा-एकदरे-गोदावरी या २३०० कोटी रुपये किंमतीच्या नदीजोड प्रकल्पामुळे ३.५५ टीएमसी पाणी उपलब्ध होणार असणे, तापी महापुनर्भरण या १९,३०० कोटी रुपये किंमतीच्या सिंचन प्रकल्पामुळे उत्तर महाराष्ट्र आणि पश्चिम विदर्भातील खारपाण पट्ट्यातील शेतकऱ्यांना लाभ होणार असणे, महाकृषी विकास अभियान अंतर्गत केवळ १ रुपयात राबविण्यात येणाऱ्या पिक विमा योजनेत नियमितता ठेवण्याच्या दृष्टीने कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांनी अधिक सतर्क होण्याची आवश्यकता, अटल भूजल योजना अधिक गतीमान करण्याची आवश्यकता, नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प टप्पा-२ ला मंत्रीमंडळाची मान्यता मिळणे, कोकणातील उल्हास आणि वैतरणा नद्यांच्या खोऱ्यातून ५४.७० टीएमसी पाणी गोदावरी खोऱ्यात वळविण्याचा प्रकल्प प्रस्तावित असणे, राज्यात शेतकऱ्यांसाठी अतिशय महत्वाचे पांदण रस्ते तातडीने पूर्ण करण्याकरिता "मातोश्री पांदण रस्ते योजना" अधिक सुटसुटीत करुन राबविण्याची आवश्यकता, राज्यात सन २०२४-२०२५ च्या हंगामांतर्गत सोयाबीन, तूर, ज्वारी, चना, कापूस इत्यादी धान खरेदी झाली असणे, शासकीय खरेदी योजनेतील अनियमितता टाळण्यासाठी योजना सक्षम करण्याची आवश्यकता, राज्यात काही गावांतील शेतकऱ्यांना डिजिटल पध्दतीने देण्यात येणारे लाभ मिळण्यात असलेल्या अडचणी दूर करण्याची आवश्यकता, "मॅगनेट २.०" अंतर्गत कृषी व्यवसायाला चालना देण्यासाठी विशेष योजना हाती घेण्यात आली असणे, ऊर्जा वापराला प्रोत्साहन देतानाच ऊर्जा निर्मितीवर भर देण्यात येत असणे, १६००० मेगावॅट क्षमतेच्या सौरऊर्जा प्रकल्पांना गती देण्याचे धोरण आखण्यात येणे जेणेकरुन, शाश्वत व स्वच्छ ऊर्जा मिळेल आणि औद्योगिक क्षेत्राला त्याचा फायदा होईल, राज्यातील सर्व

अप्रकाशित प्रत

शासकीय इमारती सन २०२५ या वर्षाच्या अखेरपर्यंत संपूर्णपणे सौरऊर्जेद्वारे विद्युतीकरण करण्याचे धोरण असणे, शेतकऱ्यांना सिंचनासाठी सौर कृषीपंप उपलब्ध करुन देणारी "मुख्यमंत्री सौर कृषी योजना" राज्यात प्रभावीपणे राबविण्यात येत असणे, सौर ऊर्जेचा वापर वाढवून शाश्वत शेतीला प्रोत्साहन देण्याचे शासनाचे उद्दिष्ट असणे, महाराष्ट्र देशासाठी रोल मॉडेल व्हावे व राज्यातील शेतकरी सुजलाम-सुफलाम व्हावा यासाठी करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**आठ : अर्धा-तास चर्चा — म.वि.प. नियम ९२ अन्वये (बैठकीच्या शेवटी) —**

**(१) श्री.सदाशिव खोत, डॉ.परिणय फुके, ॲड. निरंजन डावखरे, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीवर संचालक मंडळ नियुक्त झाल्यावर अनेक गैरव्यवहार होणे, यामध्ये अनधिकृत बांधकामे, सुरक्षा एजन्सींची नियुक्ती, वाहनतळाचे ठेके, विविध निविदा, सेस चोरी प्रकरणे आदी विविध गैरव्यवहारांमुळे बाजार समिती सातत्याने चर्चेत येणे, सदर प्रकरणाची गंभीर दखल घेऊन शासनाने तात्काळ संचालकांवर कारवाई करणे, यापूर्वी पुणे कृषी उत्पन्न बाजार समितीच्या गैरव्यवहाराबाबत केलेल्या चौकशीचा अहवाल सादर करण्यात आलेला नसणे, सदर प्रकरणी मा.मंत्री महोदयांनी चौकशीचे आदेश देऊन देखील चौकशी पूर्ण होत नसल्याची गंभीर बाब समोर येणे, याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**(२) डॉ.परिणय फुके, श्री.प्रविण दरेकर, ॲड.निरंजन डावखरे, वि.प.स. पुढील सार्वजनिक महत्वाच्या बाबींवर चर्चा उपस्थित करतील.**

"जलसंपदा विभागातील 'सिंचन सहायक' पद निर्मिती करण्यासाठी उच्चस्तरीय अभ्यास गटाची नियुक्ती करण्यात आली असणे, सदर उच्चस्तरीय समितीने उक्त पदासाठी वेतनश्रेणी रु. ५२००-२०२०० व ग्रेड पे २४०० बाबत शिफारस केलेली असणे, वित्त विभागाच्या शासन निर्णयातील जोडपत्र “अ” मुद्दा क्र.२ नुसार जबाबदा-या आणि कर्तव्यात अल्प प्रमाणात फरक आहे आणि त्या पदाचे कर्तव्य व जबाबदाऱ्यां यांचा विचार करुन प्रसंगी काही संवर्ग एकत्रिकरण करण्याचा विचार करावा, असे करतांना काही विशिष्ट पदाची आवश्यकता असल्यास अतिरिक्त वेतन देण्याचे प्रस्तावित करुन अधिक जबाबदारीचे काम त्यांच्याकडे सुपूर्द करावा असा स्पष्ट उल्लेख असणे, त्यानूसार तत्कालीन मा. सचिव (लाक्षेवि), जलसंपदा विभाग यांनी सिंचन व्यवस्थापनातील गुंतागुंत कमी होणार असल्याने सदर मागणीचा प्रस्ताव फाईल क्र.३६० आ/आतांत्रिक अन्वये वित्त विभाग व सामान्य प्रशासन विभागाकडे मंजुरीकरिता पाठविण्यात आला असणे, मंत्री जलसंपदा व लाभक्षेत्र विकास यांच्या दालनात संपन्न झालेल्या

अग्रिम प्रत

बैठकीत 'सिंचन सहायक' पदास वेतनश्रेणी रु.५२०० - २०२०० व ग्रेड पे २४०० देण्याबाबतचा निर्णय घेण्यात आला असूनही, अद्यापपर्यंत 'सिंचन सहायक' पदनिर्मिती व वेतन त्रुटीतील अन्याय दुर झालेला नसणे, त्यामुळे 'सिंचन सहायक' या पदाची निर्मिती करुन उक्त पदास वेतनश्रेणी रु. ५२०० - २०२०० व ग्रेड पे २४०० लागू करण्याबाबत शासनाने करावयाची कार्यवाही व उपाययोजना."

**विधान भवन,**
मुंबई,
दिनांक : ८ जुलै, २०२५

**जितेंद्र भोळे**
सचिव - १,
महाराष्ट्र विधानपरिषद

अस्थायी प्रत